# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली


महाराष्ट्र शासन अधिसुचना कमांक २००७/(३२२/०७) विशि—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४(१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ अधिनियम,२०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम कमांक ६)व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**( परीक्षा विभाग )**

एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली—४४२६०५

फोन नंबर ०७१३२—२२३१०४


जा.क्र./गों.वि./परीक्षा विभाग/3728/२०१८ दि. ११/१२/२०१८

**स्मरणपत्र**

## परिपत्रक

**विषयः—** सन २०१८—१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळ सदृष्य तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.

**संदर्भ :—** १.मा. शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) पुणे यांचे पत्र क्रं.उशिस.२०१८/परीक्षा शुल्क/शिष्यवृत्ती/१८६९०, दि. ०५/११/२०१८.

२. मा. शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) पुणे यांचे पत्र क्रं.उशिस.२०१८/परीक्षा शुल्क/शिष्यवृत्ती/१९०२३, दि. १७/११/२०१८.

३.मा. सहसंचालक(उच्चशिक्षण)नागपूर यांचे पत्र क्रं.उशिनाग/टंचाईग्रस्त/११२५८/२०१८, दि. १७/११/२०१८.

४. विद्यापीठाचे परिपत्रक क्रं.गोवि./परीक्षा विभाग/३४८३/२०१८, दि. १३/११/२०१८.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयीन प्राचार्य व सर्व सबंधिताना कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रान्वये राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची विद्यापीठ परीक्षा व परीक्षा मंडळे यांची परीक्षा फी माफ करण्याची योजना लागू केली आहे. यामध्ये अकृषी विद्यापीठाकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षांचा समावेश आहे. शासन निर्णयान्वये महसुल व वन विभागाकडून राज्यातील सन २०१८—१९ च्या खरीप हंगाम Trigger-2 लागू केलेल्या काही तालुक्यामध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे. दृष्काळ सदृश्य परिस्थितीवर मात करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याची सवलत लागु केलेली आहे. नागपुर विभागातील दुष्काळ ग्रस्त तालुके संदर्भीय पत्र क्रं. ३ मध्ये नमुद केलेले आहे.त्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही घ्यावयाची आहे.तसेच उपरोक्त संदर्भिय पत्रातील शासन निर्णयाचे अवलोकन करुन मा. शिक्षण सचालनालय(उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य,पुणे तसेच मा. सहसंचालक(उच्च शिक्षण),नागपूर विभाग,नागपूर यांना पात्र असलेल्या विद्यार्थ्यांची माहिती संलग्नीत केलेल्या विवरण पत्रात प्राचार्य यांचे हमीपत्रासह माहीती सादर करण्यात यावी. याबाबत संदर्भीय परिपत्रक क्रं. ४ नुसार कार्यवाही घेण्याबाबत कळविण्यात आलेले होते. परंतु अजुनपर्यत अनेक महाविद्यालयाची माहिती अप्राप्त आहे. करिता संबधित महाविद्यालयांनी कार्यवाही घेवून संबधित माहिती विवरण पत्रात भरुन तात्काळ विद्यापीठात एक प्रत सादर करावी.

सहपत्रः— संदर्भिय पत्र व विवरणपत्र — अ.

( डॉ. अनिल झेड. चिताडे)
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलीपी माहितीस्तव अग्रेषीतः—

१. मा. कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठात, गडचिरोली.
२. मा. प्र—कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.
३. मा. प्राचार्य, गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोलीशी संलग्नीत सर्व महाविद्यालये.
४. संगणक विभाग सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अपलोड करावे.

महाराष्ट्र शासन
सहसंचालक ( उच्च शिक्षण), नागपूर विभाग,
जुने मॉरीस कॉलेज इमारत, सिताबर्डी, नागपूर ४४० ००१
Website:www.jdnagpur.in Email: jdhengp@rediffmail.com
Phone No.0712- 2561713 Fax No.0712- 2554210

क्रं.उशिनाग/टंचाईग्रस्त / ११२५८ /२०१८ दिनांक : १६/११/२०१८

प्रति,

१. कुलसचिव,रा.तु.म, नागपूर विद्यापीठ, नागपूर
२. कुलसचिव,कवि कुलगुरू कालीदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक
३. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४. कुलसचिव, विधी विद्यापीठ, नागपूर
५. संचालक, शास./प्राचार्य अशासकीय अनुदानित महाविद्यालये (सर्व)

आवक क्र. 9762 दि.28/11/18

**विषय -: सन २०१८-१९ च्या खरीप हंगामातील दृष्काळ सदृश्य तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्क माफ करण्याबाबत.**

**संदर्भ -: १) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय एफईडी १५९२/१२०२/(११३२) शाशि-५, दिनांक १८/१०/१९९३**
**२) महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. एससीवाय -२०१८/प्र क्र ८९/म-७, दिनांक २३/१०/२०१८**
**३) महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. एससीवाय -२०१८/प्र क्र ८९/म-७, दिनांक ३१/१०/२०१८**
**४) उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन परिपत्रक क्रमांक शुल्क ५२१८/प्र क्र ४१३/मशि-२, दिनांक ०३/११/२०१८**
**५) महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. एससीवाय -२०१८/प्र क्र ८९/म-७, दिनांक ०६/११/२०१८**

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, संदर्भीय शासन निर्णय १ अन्वये टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफ करण्याची योजना लागु करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भीय शासन निर्णय २, ३, ५ अन्वये महसुल व वन विभागाकडून सन २०१८-१९ च्या खरीप हंगाम Trigger-2 लागु केलेल्या तालुक्यामध्ये दृष्काळ सदृश्य परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयामध्ये दृष्काळ सदृश्य परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी केलेल्या उपाय योजनांमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्क माफ करण्याची सवलत लागु केलेली आहे. दृष्काळ सदृश्य परिस्थिती जाहीर करण्यात आलेल्या तालुक्यांमध्ये नागपूर विभागातील पुढील तालुके समाविष्ठ करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | टंचाई सदृश्य तालुके |
|---|---|---|
| १ | भंडारा | लाखणी, मोहाडी, पवनी, तालुक व तुमसर तालुक्यातील नाकडोंगरी मंडल, |
| २ | चंद्रपूर | भद्रावती, ब्रह्मपूरी, चंद्रपूर, चिमुर, गोडपिंपरी, नागभीड, पोंभुर्णा, राजुरा, सिंदेवाही, वरोरा, तालुके व मुल तालुक्यातील चिखली मंडल |
| ३ | गोंदिया | देवरी, मोरगांव-अर्जुनी, सालेकसा, तालुके व गोंदिया तालुक्यातील खामटी मंडल |
| ४ | नागपूर | कळमेश्वर, काटोल, नरखेड तालुके व नागपूर (ग्रामीण मधील) गोधणी महसुली मंडल, हिंगणा तालुक्यातील आडेगाव, टाकळघाट महसुली मंडल, रामटेक तालुक्यातील देवळापार मंडल, उमरेड तालुक्यातील मकरधोकडा, हेवती, पाचगाव मंडल, कुही तालुक्यातील मांडळ महसुली मंडल |

| | | |
|---|---|---|
| ५ | वर्धा | आष्टी, कारंजा, समुद्रपूर, तालुके व आर्वी तालुक्यातील आर्वी, वाठोडा, वाघोणा, खरांगणा, विरूळ, रोहणा महसुली मंडल. वर्धा तालुक्यातील आंजी, वायगाव महसुली मंडल, सेलु तालुक्यातील झडशी मंडल |

आपले महाविद्यालयात विविध शैक्षणिक वर्षात शिक्षण घेत असलेल्या उपरोक्त तालुक्यातील रहिवासी असलेल्या ज्या विद्यार्थ्यांनी इतर शिष्यवृत्ती योजनेत परिक्षा शुल्क प्रतिपुर्ती मागणी केलेली नाही. अशा विद्यार्थ्यांना सदर सवलत लागु राहील. ही सवलत खालील विद्यार्थ्यांना लागु असणार नाही.

१) ज्या विद्यार्थ्यांना शासनाच्या अन्य शैक्षणिक सवलती योजनेनुसार परिक्षा फी माफीची /प्रतिपुर्ती उपलब्ध आहे. असे मागासवर्गीय विद्यार्थी, शिक्षक/ शिक्षकत्तर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना फी माफी सवलत, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेत अर्ज केलेल्या विद्यार्थ्याचा या मध्ये समावेश करण्यात येऊ नये.
२) जे विद्यार्थी त्याच परिक्षेत दुसऱ्यांदा बसले असतील (रिपीटर) विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात येऊ नये.
३) जे विद्यार्थी बहि:स्थ म्हणून नोंदले असतील.
४) ज्या विद्यार्थ्यांचे पालक नोकरी/ व्यवसाय करतात असे विद्यार्थ्यांना सदर सवलत लागु होणार नाही.

सद्यस्थितीत विद्यापीठांचे पहिले शैक्षणिक सत्र संपलेले असल्याने आपले महाविद्यालयातील २०१८-१९ च्या खरीप हंगामातील दृष्काळ सदृश्य तालुक्यातील रहिवासी असलेल्या पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कापोटी भरलेल्या रक्कमेची प्रतिपुर्ती करण्यासाठी ज्या विद्यार्थ्यांनी इतर शिष्यवृत्ती योजनेत परिक्षा शुल्क प्रतिपुर्ती मागणी केलेली नाही अशा पात्र विद्यार्थ्यांची माहिती सोबत जोडलेल्या विवरण पत्रात प्राचार्य यांचे हमीपत्रासह सादर करण्यात यावी.

सदर माहिती विलंबाने अथवा चुकीची सादर केल्यास व कोणताही पात्र लाभार्थी सदर लाभापासून वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्य यांची राहील.

**(डॉ. अर्चना नेरकर)**
सहसंचालक,उच्च शिक्षण,
नागपूर विभाग, नागपूर

**विवरणपत्र**

| अ. क्र. | महाविद्यालयाची नाव | विद्यार्थ्यांचे नाव | स्थायी रहिवासी पत्ता | शिकत असलेली विद्याशाखा | शैक्षणिक वर्ष प्रथम/द्वितीय/तृतीय | प्रथम सत्रातील परिक्षा शुल्क रक्कम (विद्यापीठात सादर केल्यानुसार) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |

**हमीपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, सन २०१८-१९ खरीप हंगामातील दृष्काळ सदृश्य तालुक्यातील विद्यार्थ्यांना परिक्षा शुल्क माफ सवलत योजनेअंतर्गत सादर यादीतील परीक्षार्थी या महाविद्यालयातील नियमीत असून सदर विद्यार्थी सन २०१८-१९ मधील प्रथम शैक्षणिक सत्राच्या परिक्षेला बसलेले आहेत. सदर यादीतील विद्यार्थी टंचाई ग्रस्त भागातील रहिवासी असून, त्यांनी शासनाचे इतर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत परिक्षा फी माफी/ प्रतिपुर्ती साठी अर्ज केलेला नाही.

प्राचार्य

2663
12/11/18

12/11/18

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१

web: www.dhepune.gov.in E-mail: scholarshiphd2@gmail.com
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११५३

क्र.अशिस-२०१८/परीक्षा शुल्क/शिष्यवृत्ती/18690 दिनांक- 05 NOV 2018

प्रति,
१ सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
२ कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

विषय- सन २०१८-१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळ सदृश्य तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.

संदर्भ- १ शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय, क्र.एफईडी-१५९२/१२०२/(११३२)/साशि-५, दिनांक १८/१०/१९९३
२ महसूल व वन विभाग शासन निर्णय, क्र.एससीवाय-२०१८/प्र.क्र.८९/म-७, दिनांक २३ ऑक्टोबर, २०१८.
३ महसुल व वन विभाग शासन निर्णय, क्र.एससीवाय-२०१८/प्र.क्र.८९/म-७, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८.
४ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.शुल्क-५२१८/प्र.क्र.४१३/मशि-२, दिनांक ०३ नोव्हेंबर, २०१८.

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये राज्यातील टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची विद्यापीठ परीक्षा व परीक्षा मंडळे यांची परीक्षा फी माफ करण्याची योजना लागू केली आहे. यामध्ये अकृषी विद्यापीठाकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षांचा समावेश आहे. आता उपरोक्त संदर्भाधिन क्र.२ येथील शासन निर्णयान्वये महसुल व वन विभागाकडून राज्यातील सन २०१८-१९ च्या खरीप हंगाम Trigger-२ लागू केलेल्या तालुक्यांमध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयामध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थितीवर उपाययोजना करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याची सवलत लागू केलेली आहे. यास्तव सदर १८० तालुक्यामधील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफीसंदर्भात तात्काळ कार्यवाही करावयाची आहे. त्यानुसार आपल्या अधिनस्त संबंधित दुष्काळ सदृश्य तालुक्यातील महाविद्यालयांना खालीलप्रमाणे सुचना देण्यात याव्यात.

१ संदर्भ क्र.१ येथील १८ ऑक्टोबर, १९९३ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दुष्काळ सदृश्य तालुक्यातील सवलतीस पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी परीक्षा फी न घेता त्यांचे आवेदनपत्रे विद्यापीठाकडे संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या प्रमाणपत्रावर साक्षांकित करुन पाठवावे.

२ सद्यस्थितीत विद्यापीठांचे पहिले शैक्षणिक सत्र संपलेले असल्याने महाविद्यालयाने त्यांचे महाविद्यालयात सन २०१८-१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळ सदृश्य तालुक्यातील पात्र विद्यार्थी शिक्षण घेत असल्यास सदर लाभार्थ्यांना परीक्षा शुल्कापोटी भरलेल्या रकमेची प्रतिपूर्ती करण्यासाठी त्यांचेकडून आलेल्या आवेदनपत्रावरुन

D:\april 18\Exam Fees.docx

12.11.18

Scanned by CamScanner

प्रतिपुर्तीची रक्कम परिगणना करुन संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कार्यालयाकडे आवश्यक रकमेची मागणी करावी

३ तसेच विद्यापीठाने आपल्याकडे प्राप्त झालेल्या सन २०१८-१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळ सदृश्य तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपुर्ती करण्यासाठी महाविद्यालय निहाय आलेल्या आवेदनपत्रावरुन प्रतिपुर्तीची रक्कम परिगणना करुन विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कार्यालयाकडे मागणी करावी. व सदर रक्कम महाविद्यालयामार्फत संबंधित लाभार्थ्यांस परत करण्यात यावी.

४ विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, यांनी महाविद्यालयाकडून/विद्यापीठाकडून आलेल्या माहितीची तपासणी करुन आवश्यक रकमेची माहिती संचालनालयाकडे सोबतच्या विवरणपत्र-अ मध्ये सादर करावी. सदरची माहिती सादर केल्यानंतर संचालक स्तरावरुन सहसंचालक कार्यालयांना सदर योजनेसाठी रक्कम उपलब्ध करुन देण्यात येईल व सहसंचालक स्तरावरुन संबंधित रकमेची प्रतिपुर्ती करण्यात येईल.

५ कोणत्याही परिस्थीतीत दुष्काळ सदृश्य तालुक्यातील पात्र विद्यार्थी सदर योजनेपासुन वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत- मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

Scanned by CamScanner

विवरणपत्र-अ

सन २०१८-१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळ सदृश्य तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत तपशीलाचे विवरणपत्र

| अ.क्र. | सन २०१८-१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळ सदृश्य तालुक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी फी भरली आहे अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी फी भरली आहे अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपुर्तीसाठी आवश्यक रक्कम (रुपये) | सन २०१८-१९ च्या खरीप हंगामातील दुष्काळ सदृश्य तालुक्यातील ज्या विद्यार्थ्यांनी फी न भरता प्रमाणपत्र दिले आहे अशा विद्यार्थ्यांची संख्या | ज्या विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्र दाखल केले आहे अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा फी प्रतिपुर्तीसाठी आवश्यक रक्कम (रुपये) | एकुण विद्यार्थी संख्या | एकुण प्रतिपुर्तीची रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

स्वाक्षरी

Scanned by CamScanner